# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८ अंतर्गत दाखल तक्रारीची तपासणी सूची

**क्र. रामाआ/तक्रार/१०८/२०२२/अहमदनगर**

| तक्रारदार | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. आनंदकुमार बंडोपंत कारंजकर रा. दिवाणी न्यायालय वाशी क्रोमा शोरुमच्या मागे, सेक्टर १५, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४. | ------------------- | नगर भुमापन अधिकारी, नगर भुमापन अधिकारी यांचे कार्यालय, तहसिल कार्यालय आवार, आकाशवाणी केंद्रासमोर, सावेडी, अहमदनगर, ता.जि. अहमदनगर. |

**सुनावणी दिनांक — ३०/०६/२०२३**

| तक्रार अर्जाचा दिनांक | द्वितीय अपील क्रमांक | आयोगाने दिलेल्या निर्णयचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या अहवालाचा दिनाक |
|---|---|---|---|
| १८/१२/२०२१ | ----- | ---- | २६/०६/२०२३ |

तक्रारदार यांनी दि. १८/१२/२०२१ रोजीच्या अर्जान्वये " प्रथम अपिल घेण्यास स्पष्ट पणे नकार दिला आहे आणि वेळेत माहिती दिली नाही" असे कारण नमूद करुन कलम १८ अंतर्गत तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जात त्यांनी खालील प्रमाणे विनंती केलेली आहे.

- मा. नगर भुमापन अधिकारी, अहमदनगर यांनी प्रथम अपिल अर्ज नाकारला आणि वेळेत माहिती दिली नाही यास्तव त्यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यात यावी.

२. सदर तक्रारीच्या सुनावणीस प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असुन तक्रारदार अनुपस्थित होते.

३. तक्रारदार यांनी त्यांच्या दिनांक . १८/१२/२०२१ रोजीच्या तक्रार अर्जात नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक ०५/१०/२०२१ रोजीच्या माहिती अर्जासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नसल्याने मागितलेली माहिती मिळावी, अशी विनंती सदर तक्रार अर्जान्वये तक्रारदार यांनी केली आहे.

४. तक्रारदार यांनी मुळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

क्रं. न. भु/फे.फा.व्य.बा.क्रं./६०/२०२१ जा.क्र. ९५६/२०२१, दि. ०८/०४/२०२१ या पत्रावरील कार्यवाहीबाबत दिनांक ०८/०४/२०२१ ते आज पर्यंत या कालावधीतील १) सदरचे पत्र आपणांस प्राप्त झाल्याची

तारीख मिळावी, २) सदरच्या पत्रावर आपणांकडून कार्यवाही करण्यास नियमाने लागणारा कालावधी, ३) सदरचे पत्र आपणांस प्राप्त झाल्यापासून आजपर्यंत सदर पत्रावर केलेली कार्यवाहीची संपुर्ण माहिती मिळावी, कार्यवाही केली असल्यास सदरच्या पत्राची प्रत मिळावी, ४) सदर पत्रावर कार्यवाही केली नसल्यास, कार्यवाहीस झालेल्या विलंबाची कारणे मिळावी, ५) सदर पत्रावर कार्यवाही केली नसल्यास, ज्या कर्मचाऱ्याकडे प्रकरण आहे. त्या जबाबदार असणाऱ्या कर्मचारी यांचे नांव व पदनाम याची माहिती मिळावी.

५. या प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे आणि युक्तिवादावरुन असे दिसून येते की,

१. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सांगितले की, सदर प्रकरणामध्ये संबंधीत तक्रारदार यांनी माहिती अधिकार अर्जामध्ये नमुद केलेल्या भ्रमणध्वनीवर संपर्क साधुन संबंधीत माहिती बाबत विचारणा केला असता त्यांनी सांगितले की, सदरची माहिती ही उप अधीक्षक भूमि अभिलेख श्रीगोंदा या कार्यालयाकडील सामिलीकरण प्रकरणांशी संबंधीत आहे. त्या अनुषंगाने सदरचे प्रकरणाबाबत पत्रव्यवहार झालेला असलेबाबत सांगितले होते. त्या अनुषंगाने मौजे श्रीगोंदा येथील सि.स.न.चे सामिलीकरण प्रकरणाबाबत मा. जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, अहमदनगर कार्यालयात सदर प्रकरणी खात्री/ पडताळणी करणेसाठी चौकशी केली असता सदर प्रकरणात मा. जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख अहमदनगर यांचेकडील पत्र क्र. भूमापन-१/का.वि.८५७/सामिलीकरण/२०१८ अहमदनगर दि. १७/१२/२०१८ चे पत्रान्वये उप अधीक्षक भूमि अभिलेख, श्रीगोंदा या कार्यालयास मौजे श्रीगोंदा येथील सिटी सर्व्हे नंबर ४९१, ४९२, ४९३, ४९४, ४९५, ४९६ व ४९७ या मिळकतीचे सामिलीकरण करणे बाबतचा श्री. बंडोपंत नांना कारंजकर व इतर २ याचा प्रस्ताव सादर करणेबाबतचे पत्र मा. जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख, अहमदनगर यांचे कार्यालयातील सामिलीकरण धारिकेस आढळुन आले. तक्रारदार यांचे भ्रमणध्वनीवरील संभाषणावरुन सदरचे माहिती बाबत खात्री/पडताळणी झालेनंतरच सदरचे माहिती अधिकार अधिनियम २००५ चे अर्जात तक्रारदार यांनी मागितलेल्या माहिती बाबत कार्यवाही करणेचे अधिकार व कार्यक्षेत्र या कार्यालयाचे कायक्षेत्रात येत नसलेने प्रस्तुत प्रकरणात अर्जदार यांना माहिती देता आलेली नाही. तसेच सदरची माहिती ही उप अधीक्षक भूमि अभिलेख, श्रीगोंदा या कार्यालयाशी संबंधीत असलेचे निदर्शनास आले असलेने या कार्यालयाकडील पत्र क्र. आस्था/माहिती अधिकार अर्ज क्र. ५९/का.वि.५३५/२०२१ अहमदनगर दिनांक २३/११/२०२१ अन्वये सदरचा माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये चा अर्ज माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६ (३) अन्वये उप अधिक्षक भूमि अभिलेख, श्रीगोंदा कार्यालयास हस्तांतरीत करण्यात आलेला आहे व त्यांची प्रत संबंधीत तक्रारदार श्री आनंदकुमार बंडोपंत कारंजकर यांना पाठविण्यात आलेली आहे. अर्जदार यांनी तक्रार अर्जात मागणी केलेली माहिती ही नगर भूमापन अधिकारी, अहमदनगर या कार्यालयाशी संबंधीत नाही. त्यामुळे तक्रारदार यांचे तक्रार अर्जात नमुद केले नुसार या कार्यालयात माहिती उपलब्ध असतांना देखील

त्यांनी जाणुनबुजून व हेतुपुरस्कर श्रीगोंदा येथे पाठविले व प्रथम अपिल अर्ज नाकारला आणि वेळेत माहिती दिली नाही. हे म्हणणे चुकीचे आहे. तक्रारदार यांचे भ्रमणध्वनीवर संपर्क केला असता त्यांनीच सांगितले की, सदरची माहिती ही उप अधीक्षक भूमि अभिलेख, श्रीगोंदा या कार्यालयाकडील सामिलीकरण प्रकरणांशी संबंधीत आहे. त्यामुळे सदर माहिती अधिकार अर्जामध्ये नमुद केलेप्रमाणे तक्रारदार यांना या कार्यालयाकडुन माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही.

२. या प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी वर नमूद केल्यानुसार मागणी केलेली माहिती तक्रारदार यांनी स्वत: उप अधीक्षक भूमि अभिलेख, श्रीगोंदा या कार्यालयाकडील सामिलीकरण प्रकरणांशी संबंधीत आहे असे सुचीत केले असल्याचे दिसुन येते. यावरुन तक्रारदार यांचा माहिती अर्ज वर्ग करण्यात आला असल्याचे स्पष्ट होते. तसेच त्याबाबत तक्रारदार यांना अवगत करण्यात आले असुन सदर माहिती बाबत या कार्यालयाशी संबंधीत नसल्याबाबत सुचीत केले असल्याने माहिती पुरविण्याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे स्पष्ट होते. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांनी सुचीत केले असुन देखील तक्रारदार यांनी योग्य कार्यालयात अर्ज न करता चुकीच्या कार्यालयात अर्ज केला असल्याचे दिसुन येते. त्यामुळे तक्रारदारास माहिती प्राप्त होऊ शकली नसल्याचे स्पष्ट होते, ही बाब विचारात घेता तक्रार निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. त्यामुळे तक्रार चौकशी योग्य नसुन तक्रारीत काहीही तथ्य नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

**जावक क्र.** आो-२९७४ 01 DEC 2023